# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/08/2022 (गुरूवार)

## प्रेस नोट

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नागपूर ग्रामीण पोलीस घटकातर्फे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन बहुउद्देशीय सभागृह पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथे दि. ११/०८/२०२२ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ०२:०० वा पावेतो श्री. विजयकुमार मगर (पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण), श्री.राहुल माकणीकर (अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण) यांचे मार्गदर्शनात व श्री.संजय पुरंदरे (पोलीस उपअधीक्षक गृह) यांचे उपस्थितीत भव्य निशुल्क आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीरचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर शिबीराकरीता शालीनीताई मेघे हॉस्पीटल व रिसर्च सेंटर वानाडोंगरी येथील वैद्यकीय पथक उपलब्ध झालेले होते. रक्तदान शिबीरामध्ये नागपूर ग्रामीण पोलीस दलातील ७५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी भाग घेवुन रक्तदान केले. त्यांना शालीनीताई मेघे हॉस्पीटल व रिसर्च सेंटर वानाडोंगरी कडुन प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. तसेच पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे परिवारातील सदस्यांनी आरोग्य तपासणी शिबीरामध्ये वैद्यकीय तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

पोलीस माहिती कक्ष  
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर